प्रकल्प सारांश

पर्यावरण प्रभाव मुल्यांकन अहवाल

प्रस्तावित २० किलो लिटर स्पिरिट उत्पादन प्रकल्प

प्लॉट नं सी यु १९ / १ विंचूर वाईन पार्क, विंचूर - नाशिक व्हॅली, तालुका निफाड, जिल्हा नाशिक - ४२२३०५,

मे. नाशिक अरोमा प्रायव्हेट लिमिटेड

प्रकल्प प्रवर्तक

मे. नाशिक अरोमा प्रायव्हेट लिमिटेड

प्लॉट नं सी यु १९ / १ विंचूर वाईन पार्क, विंचूर - नाशिक व्हॅली, तालुका निफाड जिल्हा नाशिक - ४२२३०५

१. प्रस्तावना

मे. नाशिक अरोमा प्रायव्हेट लिमिटेड ही प्रायव्हेट लिमिटेड कंपनी म्हणून ८ सप्टेंबर २०२३ रोजी कंपनी अधिनियम, २०१३ (२०१३ चा १८) अंतर्गत नोंदणीकृत असून नोंदणी क्रमांक U11011MH2023PTC410102 आहे. ही कंपनी प्लॉट क्र. ०१, दिग्विजय को-ऑप. हौसिंग सोसायटी, पुणे रोड, गांधी नगर (नाशिक), नाशिक, महाराष्ट्र, भारत, ४२२००६ येथे नोंदणीकृत आहे.

मे. नाशिक अरोमा प्रायव्हेट लिमिटेड हि स्पिरिट बनवण्याच्या आणि विकण्याच्या उद्देशाने प्लॉट नं सी यु १९/१ विंचूर वाईन पार्क, विंचूर - नाशिक व्हॅली, तालुका निफाड जिल्हा नाशिक येथे स्थापित करण्यात आली. सध्या नाशिक अरोमा प्रायव्हेट लिमिटेड १६२०००० लिटर वाईन चे उत्पादन करते जी द्राक्ष्यांपासून बनवली जाते करते. यासाठी उद्योगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून संचलनाची संमती (Format1.0/SRO/UAN No.0000167353/CO/2304002135) २८/०४/२०२३ रोजी प्राप्त केली आहे, जी ३१/०३/२०२६ पर्यंत वैध आहे.

मे. नाशिक अरोमा प्रायव्हेट लिमिटेड यांनी २० के एल पी डी क्षमतेचा नवीन स्पिरिट उत्पादन प्रकल्प प्लॉट नं सी यु १९ / १ विंचूर वाईन पार्क, विंचूर - नाशिक व्हॅली, तालुका निफाड जिल्हा नाशिक येथे उभारण्याचे योजले आहे. यासाठी लागणार कच्च माल जसे कि माल्ट, धान्य, मका आणि द्राक्षे हे स्थानिक बाजारातून उचले जाईल, ज्यामुळे आसवानी प्रकल्प संचालना साठी सहजरित्या उपलब्ध सुनिश्चित होईल.

उत्पादने	एकक	विद्यमान क्षमता	विस्तारीकरण क्षमता	विस्तारीकरण नंतर क्षमता
द्राक्ष्यांची वाईन	लिटर प्रति वर्ष	१६२००००	३०१००००	४६३००००
स्पिरिट	के एल पी डी	-	२०	२०

पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालय भारत सरकारच्या दिनांक १४ सप्टेंबर २००६ ईआयए अधिसूचनेनुसार आणि त्या नंतर केलेल्या सुधारणा अनुसार, हा प्रकल्प B1 श्रेणी अंतर्गत येतो, प्रकल्प किंवा क्रियाकलाप '5(g)' आसवनी (नॉन मोलॅसिस आधारित ≤ २०० के एल पी क्षमता) प्रकल्प म्हणून वर्गीकृत आहे. प्रकल्प राज्यस्तरीय तज्ञ मूल्यांकन समिती द्वारे मूल्यमापन केला जाईल.

कारखान्याने प्रस्तावित प्रकल्पासाठी समितीकडे टर्म्स ऑफ रेफ्रेरन्स साठी (TOR) प्रस्ताव दिनांक ०८/१०/२०२४ रोजी सादर केला होता (प्रस्ताव क्रमांक SIA/MH/IND2/499132/2024). राज्य पर्यावरण प्रभाव मूल्यांकन प्राधिकरण यांनी दिनांक २२ /११ /२०२४ रोजी टीओआर मंजूर केला. त्यावर आधारित पर्यावरण प्रभाव मूल्यांकन अभ्यास केला गेला आहे आणि पर्यावरण प्रभाव मूल्यांकन अहवाल

तयार करण्यात आला आहे. पर्यावरण प्रभाव मूल्यांकन अहवाल लोक सुनावणी साठी उप-क्षेत्रीय अधिकारी, नाशिक प्रदूषण नियंत्रण मंडळ यांना सादर करण्यात आला आहे.

२. प्रकल्पाचे स्थान:

हा प्रकल्प प्लॉट नं सी यु १९/१ विंचूर वाईन पार्क, विंचूर - नाशिक व्हॅली, तालुका निफाड जिल्हा नाशिक महाराष्ट्र येथे स्थित आहे. प्रकल्प भूगोलिकदृष्ट्या अक्षांश १६°१५'१७.९०"उ आणि रेखांश ७४°२१'७.१०"पु. प्रस्तावित प्रकल्प हा कारखान्याच्या स्वतःच्या १२६०० स्क्वे. मी. जागेत उभारला जाईल. प्रकल्प स्थळापासून १० किमीच्या परिसरात, नांदूरमधमेश्वर अभयारण्य स्थित आहे, हे प्रकल्प क्षेत्र पासून ८ किमी अंतरावर आहे.



Plot No. CU19/1, Vinchur winepark, Vinchur-Nashik Valley, Tal : Niphad, Dist: Nashik– 422305.

प्रकल्पाचे ठिकाण

३. प्रकल्पाची प्रमुख वैशिष्ट्ये

अ. क्र.	विवरण	स्पष्टीकरण
१	प्रकल्पाचे नाव	मे. नाशिक अरोमा प्रायव्हेट लिमिटेड
२	प्रकल्पाचे स्थान	प्लॉट नं सी यु १९/१ विंचूर वाईन पार्क, विंचूर - नाशिक व्हॅली, तालुका निफाड जिल्हा नाशिक महाराष्ट्र - ४२२३०५
३	संस्थेचे कॉन्स्टिट्यूशन	प्रायव्हेट लिमिटेड
४	प्रकल्पाची क्षमता	२० के एल पी डी
५	उत्पादन	माल्ट, धान्य, मका आणि द्राक्षे आधारित २० केएलपीडी स्पिरिट प्लांट
६	उत्पादनाद्वारे	पोमेस: ३७ मे टन/वर्षी
७	कार्यकाजाचे दिवस	३३० दिवस
८	एकूण जमीन क्षेत्र	१२६०० स्के मी
९	हरितपट्टा	४१५८ स्के मी
१०	कच्चा माल	माल्ट, धान्य, मका फळ, महुआ फुल, द्राक्षे इ.
११	पाण्याचा स्रोत	भूजल एम आय डी सी विंचूर
१२	पाण्याची आवश्यकता	२५ सी एम डी
१३	ऊर्जा	550 किलो व्हॅट
१४	सांडपाणी निर्मिती	सांडपाणी: ६५ मी^{3} प्रति दिन इतर सांडपाणी: १६.५ मी^{3} प्रति दिन
१४	सांडपाणी प्रक्रिया	डिकॅन्टेशन नंतर, न्यूट्रलायझेशन त्यानंतर एनएरोबिक अएरिएशन आणि त्या नंतर द्वितीय प्रणाली सिव्हेज हे सिव्हेज ट्रीटमेंट प्लांट मध्ये प्रक्रिया केली जाईल.
१५	वायू प्रदूषक नियंत्रक	लागू नाही
१६	मनुष्यबळ	१० कायम २० करार वरती
१७	प्रकल्प खर्च	७ + ५ = १२ कोटी (७ कोटी वाईन साठी + ५ कोटी स्पिरिट साठी)

४. प्रकल्पच्या मूलभूत गरजा

प्रकल्पासाठी लागणारी जागा – प्रस्तावित प्रकल्प हा कारखान्याच्या स्वतःच्या १२६०० स्के मी जागेत उभारला जाईल. प्रस्तावित विस्तार विद्यमान कारखाना परिसरातच होणार आहे. हा प्रकल्प प्लॉट नं सी यु १९/१ विंचूर वाईन पार्क, विंचूर - नाशिक व्हॅली, तालुका निफाड जिल्हा नाशिक महाराष्ट्र येथे स्थित आहे. या विस्तारासाठी कोणतीही अतिरिक्त जमीन आवश्यक नाही.

कच्चा माल

अ. क्र	कच्चा माल	प्रमाण मे. टन प्रति दिन	प्रति वर्ष	साठवण	स्त्रोत्र	वाहतूक
१	द्राक्षे	९५	३१५००	शेड	स्थानिक बाजारपेठ आणि शेतकरी	रस्त्याने
२	फळ	९.१	३०००	शेड	स्थानिक बाजारपेठ आणि शेतकरी	रस्त्याने
३	महुवा फुल	१०	३३००	शेड	स्थानिक बाजारपेठ	रस्त्याने
	रसायने					
१	सोडियम हायड्रोक्ससाईड	०.००२	०.६६	केमिकल रूम मध्ये घन स्वरूपात साठवले जाईल	स्थानिक बाजारपेठ	रस्त्याने
२	पोटॅशियम मेटा बी सल्फाइड	०.००१	०.३३	घन स्वरूपात ३० किलोच्या बॅग गोडावून मध्ये ठेवल्या जातील	स्थानिक बाजारपेठ	रस्त्याने
३	सायट्रिक ऍसिड	०.००२	०.६६	घन स्वरूपात २५ किलोच्या बॅग गोडावून मध्ये ठेवल्या जातील	स्थानिक बाजारपेठ	रस्त्याने
४	यीस्ट	०.००३	१.१	घन स्वरूपात बॅग मध्ये ठेवले जाईल	स्थानिक बाजारपेठ	रस्त्याने

पाणी: २० केएलडी स्पिरिट उत्पादनासाठी एकूण २०.०० घन मी प्रती दिन पाण्याची आवश्यकता आहे.

संचालन टप्पा	पाण्याचा वापर लिटर प्रति दिन
क्रशिंग	५००
सफाई	३०००
किण्वन	२०००
रॅकिंग	१०००
पॉट वॉशिंग	३०००
कुलिंग टॉवर	५०००
डोमेस्टिक	५५००
एकूण	२००००

ऊर्जा : प्रस्तावित प्रकल्प साठी ५५० किलो व्हॅट ऊर्जा लागणार आहे जी राज्य वीज मंडळ कडून घेतली जाईल.

मनुष्यबळ: विस्तारित प्रकल्पासाठी एकूण १० कायम स्वरूपी तर २० करार वरती कर्मचारी घेतले जातील. यासाठी स्थानिक लोकांना प्राधान्य दिले जाईल.

खर्च - प्रस्तावित प्रकल्पासाठी भांडवली किंमत १२ कोटी रुपये इतकी असेल.

६. पर्यावरण अभ्यास

प्रकल्प प्लॉट नं सी यु १९/१ विंचूर वाईन पार्क, विंचूर - नाशिक व्हॅली, तालुका निफाड, जिल्हा नाशिक महाराष्ट्र येथे स्थित आहे. प्रकल्प भूगोलिकदृष्ट्या अक्षांश १६°१५'१७.९०"उ आणि रेखांश ७४°२१'७.१०"पु. पर्यावरणीय अभ्यासासाठी प्रकल्प क्षेत्रापासून १० किलोमीटर त्रिजेतील परिसर ग्राह्य धरलेला आहे. हे सर्वेक्षण मार्च ते मे २०२५ या कालावधी मध्ये केले आहे.

६.१ वायू गुणवत्ता: प्रकल्प स्थळाच्या १० किलोमीटरच्या परिसरात आठ नमुने गोळा करण्यात आले. विद्यमान सभोवतालच्या हवेच्या गुणवत्तेची माहिती गोळा करण्यासाठी एक सुव्यवस्थित हवेच्या गुणवत्तेचे निरीक्षण नेटवर्क स्थापित केले गेले. निरीक्षण स्थळांची निवड विद्यमान वाऱ्याच्या प्रवाहाच्या पद्धतीच्या आधारे करण्यात आली.

PM 10: सर्वात जास्त PM10 चे प्रमाण ६७.९ µg/m^3 विंचूर गावामध्ये आढळून आलेले आहे आणि सर्वात कमी ४९.८ µg/m^3 हे दिंडोरी गावाच्या ठिकाणी आढळून आले आहे.
PM 2.5: सर्वात जास्त PM2.5 चे प्रमाण २८.९ **µ**g/m3 दिंडोरी येथे आढळून आलेले आहे आणि सर्वात कमी १५.४ µg/m3 प्रकल्प ठिकाणी आढळून आले आहे.

SO2: सर्वात जास्त SO2 चे प्रमाण ९.९ µg/m3 सोनेवाडी बु. येथे आढळून आलेले आहे तसेच सर्वात कमी ३.२ µg/m3 प्रकल्प ठिकाणी आढळून आले आहे.

NOx: सर्वात जास्त NOx चे प्रमाण १२.७ µg/m3 हे डोंगरगाव आणि नैताळे येथे आढळून आलेले आहे, तसेच सर्वात कमी ५.५ µg/m3 प्रकल्प ठिकाणी आढळून आले आहे.

CO: सरासरी ८ तास साठी CO ०.२ mg/m3 ते ०.९ mg/m3 प्रमाणात आढळून आलेला आहे, त्याते डोंगरगाव, सोनेवाडी बु., नैताळे, दिंडोरी मध्ये सर्वात कमी तर प्रकल्प ठिकाणी आणि लासलगाव गावामध्ये सर्वात जास्त प्रमाणात आढळून आले आहे.
अनुमान: वरील सर्व मापदंडे हे NAAQ, CPCB ने प्रस्थापित केलेल्या मर्यादेत आले आहेत.

६.२ ध्वनी पातळी गुणवत्ता

प्रकल्प स्थळाच्या १० किलोमीटरच्या परिसरात आठ नमुने गोळा करण्यात आले. पर्यावरण वन आणि हवामान बदल मंत्रालय आणि केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळच्या तत्वांनुसार ध्वनी पातळीची गुणवत्ता तपासण्यात आली. ध्वनी पातळी समजून घेण्यासाठी, आठ स्थाने निवडण्यात आली. सकाळी ६:०० ते रात्री १०:०० व रात्री १०:०० ते सकाळी ६:०० या वेळेत ध्वनी सर्वेक्षण केले आहे. मिळालेल्या परिणामांची तुलना ध्वनी प्रदूषण नियम २००० च्या तुलनेत केली गेली आहे. वाहनांच्या व प्रकल्पाच्या परिसर मध्ये

चालू असणाऱ्या कामकाजामुळे प्रकल्पा ठिकाणी उच्च आवाजाचा स्तर रेकॉर्ड केला गेला आहे. सर्व मुल्ये हे दिलेल्या मानकाच्या खाली आहेत.

६.३ भूतलावरील पाणी: पृष्ठजल नमुने आठ स्थळांवर गोळा करण्यात आले आहेत

- **सामू:** सर्व नमुन्यांमध्ये पाण्याचा सामू हा ७.३९ ते ८.२२ मध्ये आढळला आहे.
- **विरघळलेले पदार्थ**: सर्व नमुन्यांमध्ये विरघळलेल्या पदार्थाचे प्रमाण मर्यादित आहे. विरघळलेल्या पदार्थाचे प्रमाण ३०१ मिलिग्रॅम/लिटर ते ४९६ मिलिग्रॅम/लिटर मध्ये आढळले आहे.
- **बी.ओ.डी.:** सर्व नमुन्यांमध्ये बी. ओ. डी. ५ मिलिग्रॅम/लिटर ते १४ मिलिग्रॅम/लिटर मध्ये आढळले आहे.
- **सी.ओ.डी. :** सर्व नमुन्यांमध्ये सी.ओ.डी. २० मिलिग्रॅम/लिटर ते ४९ मिलिग्रॅम/लिटर मध्ये आढळले आहे.
- **जडत्व (टोटल हार्डनेस):** भारतीय मानकांनुसार एकूण जडत्व साठीची इच्छित मर्यादा २०० मिग्रॅ/लिटर आहे आणि नमुन्यांमध्ये आढळलेली मूल्ये हे नेमून दिलेल्या मर्यादेपेक्षा कमी आहेत.
- **क्लोराईड:** सर्व नमुन्यामध्ये क्लोराईड चे प्रमाण मर्यादित आहे. हे ३३.५ व ९५.५ मिलिग्रॅम/लिटर मध्ये आढळले आहे.
- **सल्फेट**: सल्फेट चे प्रमाण हे ४०.६ ते ९८.६ मिलिग्रॅम/लिटर मध्ये आढळून आले आहे. सल्फेट चे प्रमाण सर्व नमुन्यांमध्ये मर्यादित आहे.

६.४ भूजल पाण्याची गुणवत्ता

- **सामू**: द्रावणातील हायड्रोजन आयनांच्या संहतीचे निर्देशक म्हणजे सामू. पाण्यातील सामू हा ७.२१ ते ८.०७ दरम्यान आढळून आला आहे.
- **विरघळलेले पदार्थ (टोटल डिजॉल्वड सॉलिड):** विरघळलेल्या पदार्थाचे प्रमाण सर्व नमुन्यांमध्ये मर्यादित आहे, ते ३०२ मिलीग्राम/लि ते ४८७ मिलीग्राम/लि मध्ये आढळले आहे.
- **जडत्व (टोटल हार्डनेस):** १४१ मिलिग्रॅम/लिटर ते १९२ मिलिग्रॅम/लिटर जडत्व निरीक्षण मध्ये आढळले आहे.
- **क्लोराईड**: सर्व नमुन्यामध्ये क्लोराईड चे प्रमाण हे मर्यादित आहे, जसे कि २८.७ ते १२१.३ मिलिग्रॅम/लिटर मध्ये आढळले आहे.
- **सल्फेट**: सल्फेट चे प्रमाण हे २९.३ ते ७५.३ मिलिग्रॅम/लिटर मध्ये आढळून आले आहे. म्हणजे सल्फेट चे प्रमाण सर्व नमुन्यांमध्ये मर्यादित आहे.

६.५ मातीतील गुणवत्ता: प्रकल्प स्थळाच्या १० किलोमीटरच्या परिसरात आठ नमुने गोळा करण्यात आले

- मातीचे भौतिक गुणधर्म मातीतील हवा**,** माती मध्ये पाणी मुरण्याची आणि धरून ठेवण्याची क्षमता**,** मातीचा रंग व मातीची घनता इत्यादी ठरवतात**.**
- मातीची घनता आणि पाणी धारण क्षमता हि अनुक्रमे ०.६६ ते ०.७२ ग्राम/सेमी³ आणि वॉटर होल्डींग कप्यासीटी २१ % ते ५२ %आहे.
- मातीतील सामू ८.१ ते ८.६ श्रेणी मध्ये आहे.
- सर्वेक्षण परिसरातील मातीतील विदुयत वाहकता १५१ ते १३४० µS/cm दाखवत आहे, CEC ०.५९ ते १.२ meq/100g, मध्ये आढळतो.
- माती विश्लेषणातून असे दिसते कि सेंद्रिय पदार्थ १% ते २% या श्रेणी मध्ये आहेत आणि सेंद्रिय कार्बन ०.८% ते ४.७% या श्रेणी मध्ये आहे.
- मातीच्या नमुन्यांमध्ये उपलब्ध फॉस्फरस, पोटॅशियम आणि नायट्रोजन अनुक्रमे १४ .१ -३६ .४, २८७ – ४२१ आणि ९४.३ -११२ किग्रॅ/हेक्टरीच्या श्रेणीत आढळले आहेत.

६.६ वनस्पती आणि प्राणी

पर्यावरणीय प्रभाव मूल्यकनासाठी पर्यावरण, वन मंत्रालयांच्या मार्ग दर्शक तत्तवांनुसार, अभ्यास क्षेत्र प्रकल्पाच्या १० किमी परिघापर्यंत मर्यादित आहे. वनस्पती, प्राणी, पक्षी, आणि जलीय पर्यावरणीय प्रजातीचे निर्धारण करण्यासाठी हे परीक्षण केले आहे.

वन्स्पती: क्षेत्रीय सर्वेक्षणाच्या आधारे या भागात आढळणाऱ्या वनस्पतीची यादी तयार करून प्रथमिक माहिती बनवली आहे. या अभ्यासातून असे दिसून आले कि एकूण ८१ वनस्पती प्रजाती आहेत, त्यातील ४२ झाडे, १४ झुडपे, ७ औषधी वनस्पती, ४ पाम, ६ वेली आणि ८ गवताचे प्रजाती आहेत. या वन सर्वेक्षणातून पुढील झाडांचे वर्चस्व दिसून येते - आझादिरॅक्टा इंडिका (कडुनिंब), , मँगीफेरा इंडिका (आंबा), कॅशिआ फिस्टूला इत्यादी.

सस्तन प्राणी: सर्वेक्षणात अध्ययन क्षेत्रात १२ सस्तन प्राण्यांच्या प्रजाती आढळल्या, जसे की कुत्रा माकड, डुक्कर, गाय, बकरी, इ.

पक्षी: सर्वेक्षणादरम्यान २५ पक्ष्यांच्या प्रजाती आढळल्या. प्रमुख पक्ष्यांमध्ये कोकिळा, घरचा कावळा, निळा कबूतर इत्यादी होते. वन्यजीव संरक्षण अधिनियम १९७२ अनुसूची I नुसार यापैकी कोणताही प्राणी लुप्त होणाऱ्या प्रजाती मधला नाही.

सरपटणारे प्राणी आणि उभयचर प्राणी: अभ्यास क्षेत्रामध्ये ५ सरपटणारे आणि २ उभयचर प्राणी आढळले आहेत.

फुलपाखरे - फुलपाखरांच्या १२ प्रजाती आढळलेल्या आहेत. ब्लू मॉर्मन, कॉमन ग्रास येलो, ग्रे पॅन्सी इत्यादी. वन्यजीव संरक्षण अधिनियम १९७२ अनुसूची I नुसार कोणताही प्राणी लुप्त होणाऱ्या प्रजाती मधला नाही.

६.७ सामाजिक अर्थिक सर्वेक्षण

अभ्यास क्षेत्र मध्ये दुय्यम माहिती अनुसार २९३५१ कुटुंबामध्ये एकूण लोकसंख्या १५०६४३ आहे. यामध्ये पुरुषांची संख्या ७७९२० आणि महिलांची संख्या ७२७२३ आहे. अभ्यास क्षेत्र मध्ये एकूण २९३५१ कुटुंब आहेत आणि त्यामध्ये एका कुटुंबामध्ये सरासरी ५ व्यक्ती आहेत.
अभ्यास क्षेत्रात ६ वर्षांखालील अवलंबून असलेली लोकसंख्या १९७२८ (एकूण लोकसंख्येच्या १३.०९%) आहे. अभ्यास क्षेत्रात सरासरी साक्षरता दर ७२% आहे, ज्यामध्ये पुरुष साक्षरता ५५.४६% आणि महिला साक्षरता ४४.५३% आहे. एकूण काम करणारी लोकसंख्या ५१.१६% आहे. कार्यरत लोकसंख्येपैकी जवळजवळ ४७.८९ % लोक मुख्य कामगार श्रेणीत आहेत आणि ३.२७% लोकसंख्या सीमांत कामगार श्रेणीत आहे. अभ्यास क्षेत्रा मध्ये १६.२४ शेतकरी आणि १३.५३% शेती कामगार आहेत

७.० पर्यावरणीय प्रभाव आणि उपाययोजना

वायू प्रदूषण आणि नियंत्रण

- धुळीच्या उत्सर्जनाचे स्रोत म्हणजे कच्चा माल आणि तयार उत्पादनांचे लोडिंग/अनलोडिंग, वाहतूक आणि साठवण.
- गॅस स्वरूपातील प्रदूषक (SO_2, NOx आणि CO) हे स्टॅक उत्सर्जन तसेच वाहनांच्या उत्सर्जनातून अपेक्षित आहेत.
- वीजपुरवठा खंडित झाल्यास डिझेल जनरेटर (DG Set) कार्यरत असताना उत्सर्जन होण्याची शक्यता आहे.
- सर्व स्त्रोतांमधून होणारे उत्सर्जन कायदेशीर मानकांच्या मर्यादेत ठेवण्यासाठी पुरेशा प्रदूषण नियंत्रण उपाययोजना केल्या जातील. रस्त्यांवर पाण्याची फवारणी करून अशा उत्सर्जनावर नियंत्रण ठेवले जाईल.
- परिसरात व आजूबाजूच्या भागात वातावरणीय हवेची गुणवत्ता परीक्षण महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ (MPCB) यांच्या निर्देशानुसार केले जाईल..

- सर्व कर्मचाऱ्यांकडून श्वसनसंवर्धक संरक्षण साधनांचा (respiratory protective equipment) वापर सुनिश्चित केला जाईल.
- दुर्गंधीची समस्या दूर करण्यासाठी योग्य व्हेंटिलेशन प्रणाली उपलब्ध करून दिली जाईल.

जमीन

जमिनीच्या पर्यावरणावर परिणाम करणारे मुख्य स्रोत प्रस्तावित क्रियाकलापाचे उपउत्पादक आहेत**,** म्हणजेच प्रक्रियेमधून निघालेले सांडपाणी आणि स्लज इत्यादी.

- तयार झालेल्या सांडपाणी वर सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प मध्ये योग्य रित्या प्रक्रिया केली जाईल, कचरा उत्पादन कमी करण्यासाठी उपाययोजना घेतल्या जातील. बांधकाम कचरा पुनर्वापर केला जाईल.
- बांधकाम स्थळाची निश्चिती आणि सीमांकन योग्य पायाभूत सुविधांसह केले जाईल.
- जमिनीच्या धसक्याची शक्यता कमी करण्यासाठी योग्य उपाययोजना अवलंबल्या जातील.
- डी.जी. सेटमधून वापरलेला तेल रिसायकलर्सकडे विकले जाईल. इतर कोणताही घातक कचरा निघणार नाही.

ध्वनी प्रदूषण आणि नियंत्रण

- ऑपरेशन फेज दरम्यान**,** ध्वनी निर्माण करणारे स्रोतां मुळे ध्वनी ची पातळी वाढते**.** उद्योगातील मुख्य ध्वनी स्रोतांमध्ये फॅन्स, सेंट्रीफ्यूज, टर्बाइन, इत्यादींचा समावेश आहे.
- अत्याधिक आवाजामुळे मानवी श्रवण प्रणालीवर परिणाम होतो.
- व्यावसायीक आरोग्य आणि सुरक्षा, पर्यावरण वन मंत्रालय यांच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार बेल्ट कॉन्व्हेयर, कॉम्प्रेसर, एस टी जि, टर्बाइन आणि जनरेटर यारख्या मशीन/उपकरणांचे पुरवठादार तयार केले जातील
- यंत्रसामग्री व वाहनांचे नियतकालिक देखभालकार्य केले जाईल, ज्यामुळे आवाजाचा परिणाम कमी करता येईल.
- ध्वनी सरंक्षणासाठी वैयक्तिक सुरक्षेची ध्वनी रक्षक उपकरणे सुद्धा पुरवली जातील जसे कि ध्वनी रक्षक, इअर मफ, इअर प्लग, हेल्मेट इ
- सर्व फिरणाऱ्या वस्तू, मशिनरी याना वंगण केले जाईल तसेच आवाजाचा प्रसार कमी करण्यासाठी शक्य तितक्या बंदिस्त असतील शक्य असेल तिथे कंपन आणि आवाज कमी करण्यासाठी व्हायब्रेशन आयसोलेटर प्रदान केले जाईल

सांडपाणी प्रक्रिया: सांडपाणी उद्योग क्षेत्रामध्ये किंवा बाहेरील जागेत गेल्यास भूजल प्रदूषण होण्याची शक्यता असते मातीची पीक घेण्याची क्षमता यावरहि परिणाम होतो. असे परिणाम टाळण्यासाठी उदयोगाने झिरो लिक्विड प्रणाली बसवण्याचा निर्णय घेतला आहे. स्पेंट व्हॉश, माल्ट स्पिरिट प्लांट साफ

केलेले पाणी, क्राफ्ट रम प्लांट, पायलट फेरमेंटेशन मधून तयार होणारे पाणी इत्यादी इव्हॅपोर्टर मधून काँसंट्रेट करून घन पदार्थ बनवून तो स्लज ड्राइंग बेड वर ड्राय केला जाईल आणि कंडेन्सटें हे २० केएलपीडी कंडेंन्स्ट पॉलिशिंग युनिट मध्ये प्रक्रिया करून पुन्हा वापरले जाईल.

- ऊस रस व मॉल्ट स्पेंट वॉशमधून काढलेले घन पदार्थ सेंद्रिय खत म्हणून विक्रीस काढले जातील.
- गृहउपयोगातून निर्माण होणारे सांडपाणी प्रस्तावित मलनि:सारण संयंत्रात (क्षमता ५ केएलपीडी) प्रक्रिया केले जाईल.
- पर्जन्यजल संधारण (Rainwater harvesting) प्रकल्प परिसरात केले जातील.

घन कचरा व्यवस्थापन

अनु क्रं	घन कचरा स्पष्टीकरण	प्रमाण मे. टन प्रती महिना	व्यवस्थापन पद्धत
१	द्राक्षे पोमेस	४००	खत म्हणून वापरणे
२	सांडपाणी प्रक्रिया प्रणाली मधून निघालेला स्लज	१००	खत म्हणून वापरणे
3	अन्न कचरा	१०	खत म्हणून वापरणे

हरित पट्टा निर्मिती योजना-

एकूण जमीन: १२६०० स्के मी. आहे, त्यामधील ३३% म्हणजे ४१५८ स्के मी जागा हे हरितपट्ट्या साठी वापरली जाईल. प्रति हेक्टर २५०० झाडे आवश्यक आहेत. या जागेवर उद्योगाने १०४० झाडे लावण्याचे आयोजले आहे.

सामाजिक आणि आर्थिक वातावरण:

- रोजगाराच्या संधींमध्ये वाढ होईल, ज्यामुळे लोकांना रोजगारासाठी बाहेर स्थलांतर करावे लागणार नाही.
- साक्षरतेचा दर वाढेल.
- क्षेत्राच्या सामाजिक-सांस्कृतिक वातावरणात सुधारणा होईल.
- वाहतूक, संप्रेषण, आरोग्य आणि शैक्षणिक सेवांमध्ये सुधारणा होईल.
- व्यवसाय, व्यापार, वाणिज्य, आणि सेवा क्षेत्रात वाढ झाल्यामुळे रोजगारात वाढ होईल.
- त्यामुळे, या क्षेत्राच्या सामाजिक आणि आर्थिक वातावरणावर एकूण प्रभाव स्थानिक लोकांसाठी लाभकारी असण्याची अपेक्षा आहे.

८. पर्यावरण निरीक्षण

अभ्यास क्षेत्रातील विविध पर्यावरणीय मापदंडांच्या आधारभूत माहिती आणि प्रस्तावित प्रकल्पामुळे होणाऱ्या प्रभावांचे भविष्यवाचन आणि मूल्यांकन यावर आधारित, एक व्यापक पर्यावरणीय निरीक्षण कार्यक्रम तयार करण्यात येईल. या कार्यक्रमाद्वारे विविध विधीकीय आवश्यकता पूर्ण केल्या जातील, जसे की उत्सर्जन आणि डिस्चार्जसाठीची नियमांची पूर्तता, तसेच विविध पर्यावरणीय मापदंडांच्या ओळख पटवली जाईल.

पर्यावरणीय निरीक्षण कार्यक्रम विविध क्षेत्रे समाविष्ट करतो, जसे की:

- पर्यावरणीय वायु गुणवत्ता
- पाण्याचे प्रमाण व गुणवत्ता
- सांडपाणी गुणवत्ता
- ध्वनी पातळी
- माती गुणवत्ता
- घातक कचरा व्यवस्थापन
- सुरक्षा व आरोग्य तपासणी

९. व्यावसायिक पर्यावरण जबाबदारी

पर्यावरण व्यवस्थापन योजनेचा अतिरिक्त भाग म्हणून प्रस्तावीत प्रकल्पतर्गत १० लाख रुपये व्यावसायिक पर्यावरण जबाबदारी साठी खर्च करण्याचे योजले आहे, ज्याचा परिसराच्या स्थानिक परिस्थिती संधार्बत उपक्रम राबविण्याचा विचार केला जाईल.

प्रस्तावित उपक्रम
जवळील जिल्हा परिषद शाळा व महाविद्यालयांमध्ये पाणी शुद्धीकरण प्रणालीसह पिण्याचे पाणी सुविधा बसविण्यात येईल.
सौर उर्जे वरील दिवे जवळील शाळा, महाविद्यालये, दवाखान्या मध्ये बसवले जातील. तसेच गावांमध्ये सौर ऊर्जेचे दिवे रस्त्यावर बसवले जातील.
जवळील शाळा महाविद्यलया मध्ये संगणक प्रयोगशाळा प्रणाली बसवली जाईल
गावातील रस्त्यांच्या कडेला वृक्षारोपण करण्यात येईल
शाळेमध्ये कौशल्य विकास कार्यक्रम राबविण्यात येईल
स्थानिक शेतकऱ्यांमध्ये पीक वाढवण्यासाठी जनजागृती केली जाईल
गावांमध्ये रस्त्यांचा विकास करण्यात येईल
पर्जन्यजल संधारण (Rainwater harvesting) प्रकल्प बसवण्यात येईल

१०. पर्यावरण व्यवस्थापन योजना गुंतवणूक

अ क्र	माहिती	भांडवली खर्च (रु लाख)	आवर्ती खर्च (लाख प्रति वर्ष)
१	पाणी आणि सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प आणि कंडेन्ससेट पॉलिशिंग युनिट	७५.००	५.००
२	घन कचऱ्याची विल्हेवाट	५.००	१.००
३	हरितपट्टा विकास	५.२०	२.००
४	पर्यावरण निरीक्षण (पर्यावरणीय हवेची गुणवत्ता, ध्वनी, माती, पाणी गुणवत्ता मान्यता प्राप्त प्रयोगशाळा मधून तपासली जाईल)	००	२. १५
५	पर्जन्यजल संधारण (RWH)	२०.००	०.५
६	व्यावसायिक आरोग्य आणि सुरक्षा	५.००	०.५
	एकूण	११०.२	११.१५